CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. १५.०३.२०१९**

# शासनातर्फे गठीत करण्यात आलेल्या समितीद्वारे कोयना प्रकल्पग्रस्तांना मौजे ओवे येथे वाटपित करण्यात आलेल्या जमिनींच्या व्यवहारांच्या चौकशीचे काम प्रगतीपथावर

मौजे ओवे, ता. पनवेल, जि.रायगड येथील सिडको अधिसुचित क्षेत्रातील कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या सर्व्हे. क्र. १८३ मधील गेल्या १५ वर्षांतील जमिनींच्या व्यवहारांची तसेच संबंधित अन्य प्रकरणांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सिआयडी-३३१८/प्र.क्र.२१०/नवि-१०,दि. ०३ ऑक्टोबर, २०१८ अन्वये एक सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून दिनांक १४ जानेवारी २०१९ पासून सदर समितीचे काम सुरू झालेले आहे.

या अनुषंगाने वर्तमानपत्रात जाहिरात देखील देण्यात आली होती. सदर प्रकरणाविषयी समितीकडे माहिती देण्याचा कालावधी दिनांक १५ जानेवारी ते ३० जानेवारी २०१९ निश्चित करण्यात आला होता. या दरम्यान चौकशीच्या प्रथम टप्प्यात समितीकडे काही माहिती प्राप्त झाली आहे तर आणखीन काही माहिती प्राप्त होणे बाकी आहे. प्रथम टप्प्यात मिळालेल्या माहितीची छाननी करून समितीच्या अध्यक्षांनी चौकशीच्या दुसऱ्या टप्प्यात गरजेनुसार नवीन पत्रव्यवहार केला असून संबंधितांकडून माहिती येणे बाकी आहे.

सदर चौकशी समितीचे काम प्रगतीपथावर असून चौकशीसंदर्भात मिळणाऱ्या प्रतिसादानुसार समितीचे काम समितीद्वारे लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिध्दी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**